# निर्विवाद भाजप

बिहारमध्ये पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार येणार हे जितकं अपेक्षित होतं, तितकंच ही आघाडी द्विशतक ठोकेल, हे अनपेक्षित होतं. प्रत्यक्षात दोन्ही गोष्टी बिहारच्या मतदारांनी अगदी सहजपणे घडवून आणल्या. नितीशकुमार यांचा बिहारवर प्रभाव किती? या तिसऱ्या प्रश्नाचं उत्तरही मतदारांनी होकारार्थीच दिलं आणि राष्ट्रीय जनता दल जोपर्यंत आपल्या यादव - मुस्लीम परिघातून बाहेर येत नाही, तोपर्यंत त्यांची कामगिरी सुधारण्याची कोणतीही आशा नाही, हेही स्पष्ट केलं. मतदानोत्तर सर्वेक्षणाचे अंदाज किती फोल असतात हे बिहारच्या मतदारांनीही पुन्हा एकदा दाखवून दिलं. बिहारच्या निवडणूक निकालात मग लक्षणीय असं काहीच नाही का? तर, आहे. खूप काही आहे. काल संध्याकाळी उशिरापर्यंत सगळे निकाल लागले नव्हते. आकडे वरखाली होत होते. त्यामुळे, अशा अर्धवट निकालावर पूर्ण विश्लेषण करणं योग्य नाही म्हणून काही निष्कर्ष इथे आजच मांडता येत नाहीत. मतदारांनी जो कल दाखवला आहे, त्यावरून काही निरीक्षणं मात्र निश्चितच नोंदवता येतील. भारतीय मतदाराची मानसिकता कशी बदलते आहे, त्याचंच ते प्रतीक आहे. बिहारमध्ये यावेळी उच्चांकी मतदान झालं. महिलांचा उत्साह 'न भूतो...' असा होता. जातीचा विचार हे बिहारच्या मतदाराचं अगदी व्यवच्छेदक लक्षण मानलं जातं. यावेळी मात्र थोडं त्यापलीकडे जाऊन बिहारने भौतिक मुद्द्यांवर मतदान केलेलं दिसतं. निवडणुका हा जर स्वप्न दाखवण्याचा खेळ असेल, तर राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या भारतीय जनता पक्षाने तो आपल्या नेहमीच्या कौशल्याने जिंकला, असं म्हणता येईल.

गेली वीस वर्षं नितीशकुमार बिहारचं नेतृत्व करत आहेत. या वीस वर्षांत त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय जनता दल या दोन्ही पक्षांना सोयीनुसार बरोबर घेतलं. आपल्या गरजेनुसार वाकवलं. लोक जनशक्ती पार्टी या आघाडीतल्या तिसऱ्या पक्षाचे पंख भाजपला कापायला लावले. त्यांच्या आजारपणाच्या चर्चा करणाऱ्या सगळ्यांची तोंडं बंद केली. या चर्चेमुळे मिळालेल्या सहानुभूतीचा पुरेपूर उपयोग करून घेतला. भाजपच्या बरोबरीने जागा निवडून आणल्या. पुढचा मुख्यमंत्री ठरवताना आपला शब्दच अंतिम राहील, एवढी कामगिरी तर नक्कीच केली. लढलेल्या जागांपैकी ९०% जागा जिंकून भाजप पहिल्या क्रमांकावर असला, तरी त्याच न्यायाने ८०% जागा जिंकून नितीशकुमार यांचा जनता दल (संयुक्त) दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोक जनशक्ति पार्टी (रामविलास) ७६ टक्के यश मिळवून तिसऱ्या क्रमांकावर आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला एकूण मतदारांपैकी ५० टक्के मतांचा वाटा मिळेल, असा प्राथमिक अंदाज आहे.

पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला जेमतेम १२५ जागा मिळाल्या होत्या. भाजपच्या त्यात ७४ जागा होत्या. जनता दल (संयुक्त) ४३ जागा जिंकून आघाडीत दुसऱ्या क्रमांकावर होता. या निवडणुकीत भाजपने आपल्या जागांत दणदणीत वाढ केली; पण त्यापेक्षाही जास्त वाढ नितीशकुमारांनी करून दाखवली. भाजपने दिलेल्या मुख्यमंत्रीपदाच्या संधीचं त्यांनी याप्रकारे सोनं केलं. विरोधकांनी त्यांना 'पलटुराम' म्हणून कितीही हिणवण्याचा प्रयत्न केला, तरी बिहारच्या जनतेने त्यांच्या 'सुशासनबाबू' या प्रतिमेवर शिक्कामोर्तब केलं. बिहारच्या जनतेला लालूंचं 'जंगलराज' अजूनही आठवतं आहे, हाच त्याचा अर्थ. महिला मतदाराला आपला जनाधार करण्याचा निर्णय नितीशकुमार यांनी पाच वर्षांपूर्वीच घेतला होता. त्याची सुरुवात त्यांनी बिहारमध्ये दारूबंदी लागू करून केली.

भारतीय जनता पक्षाच्या अन्य राज्यांनी राबवलेल्या योजनेच्या धर्तीवरील 'मुख्यमंत्री महिला रोजगार योजना' राबवून त्यांनी सव्वाकोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीपूर्वीच प्रत्येकी दहा हजार रुपये जमा केले. १२५ युनिट मोफत वीज देण्याची कल्पना भाजपची. पण, त्या योजनेला सौर ऊर्जेची जोड देऊन सौर पॅनल मोफत देऊन दीड कोटी कुटुंबांना त्यांनी आपलंसं केलं. जातनिहाय जनगणना करून इतर मागासवर्गीयांतल्या अधिक मागास जातींचा विशेष गट करून त्यांच्यापर्यंत योजनेचे लाभ थेट पोहोचवण्याचा सामाजिक कार्यक्रमही त्यांना चांगला लाभ देऊन गेला. बिहारच्या एकूण लोकसंख्येत या जातींचा वाटा ३६ टक्के आहे.

भारतीय जनता पक्षाचा जनाधार असलेल्या उच्च जाती आणि नितीशकुमार यांनी जनाधार मिळवलेल्या या इतर मागास जाती अधिक जितनराम मांझी अधिक चिराग पासवान यांच्या पक्षाचे जनाधार मिळून बिहारमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मतदारांची सामाजिक मोट व्यवस्थित बांधली गेली.

# संत तुकाराम महाराज विद्यालयात बालक दिन साजरा



रिसोड : तेथून जवळ असलेल्या कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू जयंती व बालकदिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम शाळेचे प्राचार्य साहेबराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला शाळेचे गणित शिक्षक श्री मदन खानझोडे यांनी पंडित नेहरू व बालक दिन या विषयी मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे संचालक सुनीलभाऊ ढेकळे यांनी बालक दिनानिमित पार्ले बिस्कीटचे वाटप विद्यार्थांना करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी मोलाचे परिश्रम घेतले. श.प्र.

# रिसोड नगर परिषदेसाठी भाजप शिवसेनेची युती

## राष्ट्रवादीची महायुतीबाबत भूमिका अस्पष्ट

रिसोड : निवडणुकीच्या घोषणेपासूनच महायुतीबाबत सुरू असलेल्या विविध चर्चेना अखेर दिनांक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी पूर्णविराम लागला मात्र तरी यामध्ये राष्ट्रवादी भूमिकेबाबत शंका उपस्थित केली जात आहे. रिसोड नगर परिषद निवडणुकीसाठी भाजप व शिवसेना शिंदे गटाची अखेर युती झाल्याची घोषणा करण्यात आली व विविध चर्चेला आलेले उधान अखेर शमले आहे.

जागा वाटपाबाबतही बोली झाली असून २३ नगरसेवक जागा पैकी ७ जागा नगरसेवकाच्या ह्या शिवसेनेला देण्यात आल्या असून भारतीय जनता पार्टी नगराध्यक्ष व १६ जागा नगरसेकांच्या लढविणार असल्याची माहिती समोर आली असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बाबत मात्र अद्याप चित्र स्पष्ट झाले नाही याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांना विचारणा केली असता याबाबत बोलणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले भारतीय जनता पार्टी व शिवसेना युती बाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजि सभापति गजानन पाचरणे, शिवसेना जिल्हाप्रमुख महादेव ठाकरे, शिवसेना तालुका प्रमुख मच्छिंद्र ढोणे पाटील यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली असून संयुक्त बैठकीदरम्यान सदर निर्णय घेण्यात आला आहे. या युतीबाबत दोन्ही गटाकडून दुजोरा देण्यात आला आहे. सदर युती झाली असली तरी मात्र रिसोड शहरातील प्रभाग २ मधे मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचीही माहिती समोर आली आहे. सदर युतीबाबत १३ नोव्हेंबर रोजी प्रभाग निहाय जागा वाटपाबाबत अधिकृत उमेदवाराची घोषणा केली जाणार असल्याचेही दोन्ही गटांच्या नेत्यांकडून माहिती मिळाली आहे. सदर युती व्हावी व नगरपरिषद निवडणूक सोबत मिळून लढावी यासाठी युतीचे समन्वयक म्हणून गजानन पाचारणे हे अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते. या युतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गटाला जागा न सुटल्याने आता राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते काय भूमिका घेतात याकडे रिसोड वासियांची लक्ष लागले आहे भाजप सेना ही युती नेत्यांनी केली असली तरी इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते युती कडे कसे पाहतात हे पाहावे लागेल. ता.प्र.


ई-निविदा सुचना

महाराष्ट्र शासन

मृद व जलसंधारण विभाग

## जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, वाशिम

**पत्ता : जुनी जिल्हा परिषद इमारत परिसर, वाशिम ४४४५०५**

**ई-निविदा सूचना क्र. १८ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्य राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशिम हे **सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता कंत्राटदार व मजूर कामगार सहकारी संस्थेकरीता** खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई - निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ **https://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई- निविदा सुचना बाबत सर्व माहिती शासनाचे संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशिम यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. **सदर काम हे जिल्हा नियोजन समिती, वशिम सन २०२५-२०२६ अंतर्गत मंजुर करण्यात आले आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदाची अंदाजित किंमत | बयाणा रक्कम रुपये | ई-निविदा संचाची किंमत रु. | काम पुर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणीचा किमान वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुर संरक्षक भिंत मौजे - जांभरुण परांडे ता.जि. वाशिम येथील काम | १५८९८९१ | १५९०० | २३६० | १२ महिने | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव |
| २ | व्दारयुक्त सिमेंट साठवण बंधारा मौजे- सोयता ता.जि. वाशिम | २९७९७७७ | २९८०० | २३६० | १२ महिने | सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता करीता राखीव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा उपलब्ध कालावधी | -- | दिनांक | २०/११/२०२५ (१२.००) | ते दिनांक | २७/११/२०२५ (१८.००) |
| २ | निविदा उघडण्याचा कालावधी | --- | दिनांक | २८/११/२०२५ (१८.०१) | | |

**खालील ठिकाणी ई-निवीदा बाबतची सर्व माहीती उपलब्ध आहे.**

१) ई-निवीदा दिनांक २०/११/२०२५ पासुन **http://mahaetenders.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
(निवीदा सुचना मध्ये काही बदल असल्यास उपरोक्त संकेत स्थळावर उपलब्ध राहील.)

२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, वाशीम यांचे कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध आहे.

३) संकेतस्थळावर प्रसिध्द होणाऱ्या वेळापत्रकानुसार निवीदा उघडण्याची तारीख व वेळेप्रमाणे कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनीधीने उपस्थित राहावे, अन्यथा निवीदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

४) सदर कामांची निवीदा प्रक्रिया ही शासन निर्णय महाराष्ट्र शासन, **जलसंपदा विभाग क्रं निवीदा/०४१७/प्रक्रं. २४७/मोप्र-१ दि.१८.१०.२०२३ अन्वये राबविण्यात येईल.**

स्वाक्षरीत/-

**जिल्हा जलसंधारण अधिकारी**

मृद व जलसंधारण विभाग, वाशिम

**जिमाका / वाशिम / जाहिरात/८४/२०२५-२०२६**


**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# भा.मा.कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात बालक दिन साजरा

रिसोड : रिसोड तालुक्यातील एकमेव मुलींचे भारत माध्यमिक कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती व बालक दिन साजरा करताना कार्यक्रमाच्या अध्यक्षा महाविद्यालयाच्या प्राचार्या मंजुषा सु. देशमुख मॅडम व प्रमुख अतिथी पर्यवेक्षक सुनील डहाळके व ज्येष्ठ शिक्षिका प्रा. वृषाली देशमुख , प्रा. एस.ओ. चोमवाल या मान्यवरांच्या हस्ते प्रथमतः माता सरस्वती व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थिनींनी बहारदार असे गीत सुमधुर स्वरात सादर केले.



त्यामध्ये सहभागी विद्यार्थिनी समृद्धी गव्हाणे तसेच पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे विद्यार्थिनींनी केली त्यामध्ये आरती गायकवाड अनुष्का शेंडोकार किरण कोरडे अपूर्वा मोरे प्राजक्ता भोसले ऋतुजा अडळकर शिक्षा सपकाळ धनश्री कोटकर आरती गोल्हारे आरती बिल्लारी पायल शिंदे प्रियंका ढोले किरण सदार प्रिया धांडे आरती साळवे आचल साळवे भूमिका चतरकर प्रेरणा साळवे आणि काव्या सानप या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या नेहरूजींच्या जीवनावर प्रकाश टाकला. शेवटी प्रमुख अतिथी पर्यवेक्षक सुनील डहाळके यांनी मनोगत व्यक्त करताना अशा कार्यक्रमातूनच मोठमोठी वक्ते विचारवंत तयार होतात हे व्यासपीठ नोदितांचा मंच आहे असे भवोद्गार या प्रसंगी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सांगता आदरणीय प्राचार्या मंजुषा सु. देशमुख यांनी आपल्या मनोगतातून पंडित नेहरू म्हणजे धनवान, रूपवान कीर्तीमान बुद्धिमान आणि सौंदर्य यांचा संगम असलेला लेखक विचारवंत चारित्र्यसंपन्न कर्तव्यतत्पर व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचे धनी म्हणजे नेहरूजी यांच्या विचाराचा आदर्श प्रत्येकाने घ्यावा असे सूचक विधान आपल्या मनोगतातून केले. कार्यक्रमाचे बाहारदार सूत्रसंचालन प्राध्यापिका साधना बोरकर यांनी केले व आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षिका मंगला शेटे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले. श.प्र.

# श्री सखाराम महाराज यात्रा महोत्सवाला सुरुवात



रिसोड : श्री सखाराम महाराज यांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र लोणी येथील श्री सखाराम महाराज समाधी मंदिर मध्ये १५ नोव्हेंबर रोजी गरुड खांब पूजन व दिनांक १६ नोव्हेंबर रोजी चांदनी पूजन व स्थापना करून यात्रा महोत्सवाला सुरुवात करण्यात आली. श्री सखाराम महाराज संस्थांन चे वंशस्त डॉक्टर सखा महाराज यांनी गरुड खांब पूजन करून विधिवत स्थापना केली . यावेळी गोविंद महाराज,कल्याण महाराज व मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते. गरुड खांब पूजन केल्यानंतर सुहासिनी हळद कुंकवाचे हातवे लावून भाविक भक्त मोठ्या भक्ती भावाने गरुड खांबाची स्थापना करतात. गरुड खांब पूजनाने श्री सखाराम महाराज पुण्यतिथीच्या यात्रा महोत्सवाला सुरुवात झाली. यात्रेतील दुकानदारांचे जागावाटप, रथोत्सवाच्या रथाची स्वच्छता, महापंगत स्वयंपाकाची तयारी, इत्यादी कामे प्रामुख्याने सुरू झाली. श्री सखाराम महाराजांची पुण्यतिथी व महापंगत दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी आहे. आज सोमवार १७ नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता महापंगत पुरीच्या प्रसादाला सुरुवात होणार आहे. ५१ क्विंटल ची पुरी, ५० क्विंटल ची भाजी, ४० क्विंटल चा शिरा हा प्रसाद सोमवारपासून बुधवारपर्यंत अहोरात्र भाविक भक्त तयार करतात. ता.प्र.

# मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदार अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण

रिसोड : २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर १६ नोव्हेंबर रोजी मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण भारत माध्यमिक शाळा व ज्युनिअर कॉलेज, रिसोड येथे आयोजित करण्यात आले.

प्रशिक्षणामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रतिक्षा तेजनकर यांनी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचे मार्फत करण्यात आलेले विशेष बदल अधोरेखित करून त्याबद्दल सविस्तर माहिती सर्वांना दिली. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतिश शेवदा यांनी प्रभागनिहाय मतदार यादीमधील संभाव्य दुबार नावांबाबत राज्य निवडणूक आयोगामार्फत देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे परिशिष्ट अ आणि परिशिष्ट ब बाबत सविस्तरमाहिती देऊन मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यपद्धतीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तदनंतर तालुका कृषी अधिकारी मगनदास तावरे व इतर मास्टर ट्रेनर यांनी सर्व प्रशिक्षणार्थी यांना संपूर्ण मतदान प्रकियेबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले तसेच सर्वांना प्रशिक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई मतदान यंत्रावर प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रशिक्षणादरम्यान जिल्हा सह आयुक्त बाबुराव बिक्कड यांनी भेट देऊन मनुष्यबळ नियोजन, प्रशिक्षण नियोजन व निवडणुकीबाबत एकंदर आढावा घेतला. सदर प्रशिक्षणास मा. निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रतिक्षा तेजनकर, जिल्हा सह आयुक्त बाबुराव बिक्कड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सतिश शेवदा व इतर अधिकारी/कर्मचारी मास्टर ट्रेनर उपस्थित होते. ता.प्र.

# स्वामी विवेकानंद विदयालयात जननायक बिरसा मुंडा जयंती साजरी



रिसोड : तालुक्यातील स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व्याड येथे १५ नोव्हेंबर शनिवारी जननायक बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी जाधव प्रमुख अतिथी म्हणून सैनिक विष्णु गिरी, शंकरगिरी, समाजसेवक ज्ञानेश्वर बोंडे,ज्येष्ठ शिक्षक रवी अंभोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. व्याड येथील नुकतीच भारतीय सैन्यामध्ये नियुक्ती होऊन सिक्कीम येथे सेवेत असणारे सैनिक विष्णू गिरी या माजी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला प्रसंगी बिरसा मुंडा यांच्या विषयी मनोगत व्यक्त करताना जाधव यांनी बिरसा मुंडा च्या जीवनावर प्रकाश टाकला जमीन जंगल आणि जल यासाठी संघर्ष करणारे व आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे बिरसा मुंडा हे सामाजिक चळवळीचे नायक म्हणून सदैव स्मरणात राहतील असे गौरवोद्गार यांनी काढले शिक्षिका दुर्गा घोगरे यांनी बिरसा मुंडा यांच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंत त्यांच्या संघर्षमय जीवनाची सर्व माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले खोबरे यांनी बिरसा मुंडा च्या संघर्ष चळवळीत त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीला प्रेरणा देणारे असल्याचे म्हटले प्रसंगी ज्ञानेश्वर बोंडे यांनीही मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक गजानन लांभाडे यांनी सूत्रसंचालन ज्ञानेश्वर मांडे यांनी आभार प्रवीण सरनाईक यांनी मांडले.

प्रसंगी विद्यालयाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श.प्र.

## दिव्यांग व अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, दि. १७ : दिव्यांग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याकरिता या योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र जोडप्यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी विवाह नोंदणी दाखला, वर व वधू यांचे शाळा सोडल्याचे दाखले, वर अथवा वधू यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र, वर व वधू यांचे एकत्रित लग्नातील छायाचित्र, दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारसपत्रे, वर व वधूचे महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, वर व वधूचे पोस्ट ऑफिसमधील संयुक्त खाते पासबुकची छायांकित प्रत अथवा वर व वधूचे राष्ट्रीयकृत बँकेतील संयुक्त खाते पासबुकची छायांकित प्रत या कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी अर्जांसाठी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर.सी. मार्ग, चेंबूर (पू.), मुंबई-७१ येथे संपर्क साधावा. या योजनेच्या अर्जाचे नमुने संबंधित कार्यालयात उपलब्ध होतील, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# कृषी महाविद्यालयच्या विद्यार्थ्याला रनिंग स्पर्धेत मिळाले दोन गोल्ड मेडल



रिसोडः डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय रिसोड येथील सहाव्या सत्राचा विद्यार्थी प्रेम भारस्कर याला दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे विद्यापीठ स्तरावर आयोजित केलेल्या १०० मीटर व २०० मीटर दोन्ही रनिंग स्पर्धेत प्रथम आल्याबद्दल दोन गोल्ड मेडल ने सन्मानित करण्यात आले या स्पर्धेमध्ये विद्यापीठांतर्गत २० विविध कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता त्यामध्ये प्रेम भारस्कर हा १०० व २०० मीटर दोन्ही रनिंग स्पर्धेमध्ये प्रथम आला त्याच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे विश्वस्त चैतन्य भैय्या देशमुख, तांत्रिक समन्वयक राजेश डवरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष आपतुरकर यांनी अभिनंदन केले असून या त्याच्या यशासाठी त्याचे कोच तथा स्पोर्ट प्राध्यापक एल बी काळे यांच्यासह कृषी महाविद्यालयातील संपूर्ण टीमने अथक परिश्रम घेतले प्रेम भारस्करच्या या यशाबद्दल सर्वच स्तरावर त्याचे कौतुक होत आहे. वि.प्र.

# तालुक्यात नेटवर्क समस्या

रिसोड : तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ईटरनेट नेटवर्क समस्या निर्माण झाली आहे. विविध कंपनांचे सिमकार्ड वर ईटरनेट स्पीड बरोबर मिळत नसल्यामुळे ग्राहक त्रस्त झाले आहे.

आज मोबाईल, संगणकाशिवाय पान ही हलत नाही. ही सर्व साहित्य इंटरनेटवर चालणारी आहेत. नेट नाही तर उपयोग शून्य, अशी स्थिती असते. आज मोबाईल प्रत्येकाकडे आहे. लॅपटॉप, संगणक वापरणारे अनेक जण आहेत, मात्र ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी कंपन्यांची नेट काम करीत नाही. मोबाईल टॉवरची नेटवर्क गायब होत असल्याने महत्त्वाचे बोलणे किंवा संगणकावरील महत्त्वाची कामे करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

## विद्यार्थ्यांना जिल्हाधिकाऱ्यांचा प्रेरणादायी संदेश

# सेवाभाव आणि नीतिमूल्यांनी डॉक्टर घडावेत - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

### ■ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम' येथे नवप्रवेशीत विद्यार्थ्यांचा व्हाईट कोट समारंभ उत्साहात ■

**वाशिम,दि.१७ नोव्हेंबर (जिमाका) डॉक्टर जीवन वाचवणारे, वेदना कमी करणारे आणि लोकांच्या मनात आशा निर्माण करणारे मानवतेचे सेवक आहेत. एका रुग्णाच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू फुलवण्याची ताकद त्यांच्या हातात असते म्हणूनच समाज डॉक्टरांकडे अढळ विश्वासाने पाहतो. ज्ञान, कौशल्य आणि संवेदनशीलता यांची सांगड घालूनच एक उत्कृष्ट डॉक्टर घडतो. रुग्णाचे दु:ख समजून घेणे, त्याला धीर देणे आणि प्रत्येक टप्प्यावर सोबत उभे राहणे हीच त्यांच्या सेवाभावाची खरी ओळख आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**




शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम येथे नव्या वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी व्हाईट कोट सेरेमनीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व औचित्यपूर्ण वातावरणात पार पडला.यावेळी जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर बोलत होते. पुढे बोलतांना, जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचा प्रेरणादायी संदेश दिला. वैद्यकीय क्षेत्र समाजसेवेची मोठी संधी आहे.असे सांगून त्यांनी सेवाभाव, मानवतावादी दृष्टिकोन आणि शिस्त या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. डॉक्टर आरोग्य-जागृतीचे दूत म्हणून निरोगी जीवनशैली, स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा समाजापर्यंत पोहोचवतात. त्यांच्या एका योग्य निर्णयामुळे संपूर्ण कुटुंब वाचू शकते आणि एका सल्ल्यामुळे भविष्यातील आजार टाळता येतो. वैद्यकीय सेवा हे एक पवित्र व्रत आहे.निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभावाचा शुद्ध संगम होय. एक नवी जबाबदारी, नवी प्रतिज्ञा आणि समाजाप्रतीची नवी वचनबद्धता आहे. असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

यावेळी डॉ. सतीश देव पुजारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, डॉ. पुरी, डॉ. झरे, डॉ. खाकसे, आणि डॉ. हरीष बाहेती, अधिष्ठाता डॉ.सतिन मेश्राम ,उपअधिष्ठाता डॉ.धरमसिंग पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सतीश मेश्राम यांनी करून व्हाईट कोटच्या मूल्याचे महत्त्व स्पष्ट केले.व्हाईट कोट हा केवळ श्वेत कपडा नाही, त्यामागे उच्च नैतिक मूल्ये, निष्ठा आणि रुग्णाप्रती आदराची भावना दडलेली आहे. वैद्यकीय क्षेत्र हा सेवा आणि विज्ञानाचा अद्भुत संगम आहे.

एका डॉक्टरला ज्ञानासोबत कौशल्यही असणे आवश्यक आहे, परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे मनात सहानुभूती, नम्रता आणि नीतिमत्ता ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डॉ. सतीश देव पुजारी यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाला विशेष उंची मिळाली. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले .ते म्हणाले, विद्या विनयेन शोभते या ब्रीदवाक्यानुसार ज्ञानाला नम्रतेची जोड मिळाली तरच ते पूर्णत्वास जाते, हे त्यांनी अधोरेखित केल.प्रत्येक वैद्यकीय विद्यार्थ्याने रुग्ण, समाज आणि संस्थेबद्दल असलेल्या जबाबदाऱ्या ओळखून प्रामाणिकपणे त्यांची पूर्तता करण्याचे आवाहन केले. दि ३ एच'एस ह्तीन घटकांची सांगड हा भविष्यातील आदर्श डॉक्टर घडवतो, असे त्यांनी सांगितले. शिस्त, अध्ययनातील सातत्य आणि वैद्यकीय कौशल्य यांचा समतोल राखणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वागणूक, संवाद, रुग्णांशी असलेला संवाद, गोपनीयता आणि वेळेचे नियोजन यांना वैद्यकीय व्यावसायिकतेत विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले. रुग्णसेवा ही टीमवर्कवर आधारित असते. नर्सिंग स्टाफ, टेक्निशियन, सहकारी डॉक्टर यांच्याशी समन्वय केल्यासच रुग्णांना उत्कृष्ट सेवा देता येते, असे त्यांनी सांगितले. वाशिमसारख्या शांत आणि शिक्षणास पोषक ठिकाणी शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना अधिक लक्ष केंद्रीत करता येते, असेही त्यांनी सांगितले. सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाशी जोडून घेतल्यास विद्यार्थी अधिक संवेदनशील, जबाबदार व समजूतदार डॉक्टर बनतात, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्त, नीतिमूल्ये, सेवाभाव आणि व्यावसायिकतेची शपथ घेत 'व्हाईट कोट' धारण केला.

कार्यक्रमास अध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. मेडिकल प्रोफेशनमध्ये प्रवेशाचे प्रतीक असलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आणि अभिमानाचे वातावरण होते. संचालन डॉ. अनुश्री तरोडे आणि डॉ. स्वाती कलंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली तमन्ना तालरेजा, ऋचा जाधव, राशी धोंडे, यश पांडव यांनी केले.तर आभार चंदन वत्स यांनी मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय होईल!

### स्थानिक निवडणूक

**मुंबई:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परवापर्यंत तुम्हाला चित्र स्पष्ट दिसेल.



जिथे शक्य आहे, तिथे महायुती झालेली आहे. स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

या गोष्टी स्थानिक स्तरावर होत असतात. स्थानिक स्तरावर चर्चा सुरू आहेत. काही ठिकाणी महायुती झालेली आहे. काही ठिकाणी झाली नाही. स्थानिक स्तरावर हे सगळे निर्णय होत आहेत. त्यामुळे परवापर्यंत चित्र स्पष्ट दिसेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते पत्रकारांशी बोलत होते.जागावाटपाबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जागावाटप वरून होतच नाही. जागावाटप जिल्ह्यात होते. त्यामुळे जिल्हा स्तरावर त्या-त्या पक्षांनी एकत्र येऊन त्याबाबत ठरवलेले आहे जिथे शक्य आहे, तिथे महायुती झालेली आहे कुठे दोन पक्षांची युती झालेली आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती

कुठे-कुठेच युती झालेली नाही. ही जिल्हा स्तरावरची निवडणूक आहे. ही राज्याची निवडणूक नाही. त्यामुळे स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय होईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. महापालिकेतील निकष वेगळे असतातमहापालिकेतील निकष वेगळे असतात. महापालिका ही मोठी शहरे आहेत. त्यामुळे जिथे शक्य आहे, तिथे आमची युती होणार. प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या विधानावर देवेंद्र फडणवीस यांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. त्यांच्या म्हणण्याचा रोख कुणाकडे आहे, ते तुम्ही शोधून काढा. आमच्याकडे रोख नाही, हे नक्की सांगतो. अजित पवार यांची बिहार निवडणूक लढवण्याची तयारी नव्हती आणि त्यामुळे ते बिहारलाही गेले नाहीत, असे फडणवीस म्हणाले.

# रिसोड येथे मोफत भव्य गुडघा प्रत्यारोप शस्त्रक्रिया शिबिर

रिसोड : ममता आणि मधुसुदनअग्रवालफाउंडेशन, मुंबई तसेच संजीवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने रिसोड शहरात मोफत मेगा गुडघा व नितंब प्रत्यारोप शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात येत आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष मधुसुदनजी अग्रवाल यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम म्हणून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

ममता सर्वस्व आरोग्य सेवा केंद्र, बगडिया कॉम्प्लेक्स गुजरी चौक रिसोड येथे हे शिबिर २३ ते ३० नोव्हेंबर २०२द५ या कालावधीत आयोजित होणार आहे. विदर्भ मराठवाडा परिसरातील गुडघा व नितंब समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी हे शिबिर वरदान ठरणार असून आवश्यक त्या रुग्णांची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहे. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची प्रगत तपासणी करण्यात येणार असून आजाराच्या प्रकारानुसार शस्त्रक्रियेची गरज असल्यास त्यासाठी पूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. रुग्णांना अत्याधुनिक मॉडेलएक्स-रे, आवश्यक वैद्यकीय तपासण्या तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे सल्लामसलत सत्र व वैज्ञानिक पद्धतीने तपासणी तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. या शिबिरात जगप्रसिद्ध गुडघा प्रत्यारोपण शल्यविशारद व २८००० हून अधिक गुडघा-नितंब प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केलेले डॉ. नारायण खंडेलवाल सहभागी होत आहेत. तसेच प्रसिद्ध ऑर्थोपेडिक विशेषज्ञ डॉ. शारिक अन्सारी देखील शिबिरामध्ये उपस्थित असणार आहेत. सतत गुडघेदुखी किंवा नितंबदुखीचालणे, बसणे, जिने चढणे यात त्रास, सांध्यांमध्ये सूज, कडकपणा औषधोपचारांनी आराम न मिळणजीवनमानावर परिणाम करणारी वेदना अशा रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

'समाजसेवेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना नवीन आयुष्य देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आर्थिक परिस्थिती संसाधनांअभावी अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया करवता येत नाही; अशांना मदत करण्याचा हा उपक्रम असून अधिकाधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदन अग्रवाल यांनी त्यांनी केले. गरजू रुग्णांनी अधिक माहिती करिता विनोद मोरे आवेश खान यांच्याशी संपर्क साधावा.ता.प्र.

# नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक निरीक्षक यांची आढावा बैठक



रिसोड: राज्यनिवडणूकआयोग यांचे ०४ नोव्हेंबर २०२५ च्याप्रसिद्धी पत्रकात जाहीर केल्यानुसार नगर परिषद व नगर पंचायतीसाठी सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे निर्देशानुसार विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचे दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ चे आदेशानुसार अनिल खंडागळे, अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालययवतमाळयांचीनगरपरिषद रिसोड निवडणूक-२०२५ करिता निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्तीप्रमाणे निवडणूक निरीक्षक अनिलखंडागळेयांनीआजरिसोडयेथे निवडणूक कामकाजाबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी निवडणूक निरीक्षक यांनी निवडणूक संदर्भातील नियुक्त पथक प्रमुख यांच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच त्यांनी मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दाखल होत असलेले नामनिर्देशन पत्र स्वीकारतांना तपासावयाचे दस्तावेज, पडताळणी सूची याबाबत पथक प्रमुख व इतर सहायक यांना मार्गदर्शन केले. रिसोड नगर परिषद निवडणुकी संबधात स्थापन केलेलेतक्रार निवारण कक्ष, मतदार सहायता कक्ष, आदर्श आचार संहिता कक्ष, तहसील कार्यालय रिसोड स्थित सुरक्षा कक्ष यांची पाहणी केली. तसेच मतदान यंत्र सिलिंग, मतदानाकरिता साहित्य वाटप व मतमोजणीबाबत तयारीचा आढावा घेतला.तदनंतर त्यांनी शहरातील मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील आवश्यक सुविधांचा आढावा घेतला. यासोबतच मा. निवडणूक निरीक्षक यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने नियुक्त करण्यात आलेले स्थिर सर्वेक्षण पथक, व्हिडीओ सर्वेक्षणपथक, फिरतेपथक यांना भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी करून कामकाजाबाबत आवश्यक ते निर्देश दिले व निवडणूक कामकाजासंदर्भातील नियोजनाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती प्रतिक्षा तेजनकर, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सतिश शेवदातसेच इतरअधिकारी/कर्मचारी उपस्थित होते